# Dr. B.R. Ambedkar: Indian Society and Ambedkarite Literature

## डॉ.बी.आर.आंबेडकर: भारतीय समाज आणि आंबेडकरी साहित्य




*Editor-in-Chief*

**Dr. Sachin Gundurao Kamble**
(M.A. NET, SET, Ph.D.)

Assistant Editor
**Mr. Vaibhav Kamble, Asstt. Prof.**
**Mr. Babasaheb Sable, Asstt. Prof.**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | आंबेडकरवादी तत्वज्ञान आणि आजचे वास्तव-<br>डॉ.अशोक डोळस, पाथर्डी | 57-63 |
| २. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि संसदीय लोकशाही<br>प्रा. धनाजी कठरे, वडूज | 64-69 |
| ३. | दलित साहित्यातील पिळवणूक<br>प्रा.युवराज खरात, रहिमतपूर | 70-82 |
| ४. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीविषयक विचार काल आणि आज<br>प्रा.माधवी पवार, रेठरे, ता.कराड | 83-91 |
| ५. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार<br>प्रा. वैभव कांबळे, दौलतनगर, ता.पाटण | 92-97 |
| ६. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर –अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा<br>डॉ. जितेंद्र कदम, खटाव | 98-109 |
| ७. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक व राजकीय चळवळ<br>डॉ. सुनिल साठे, दौलतनगर, ता.पाटण | 110-113 |
| ८. | एक अनुकरणीय जीवनादर्श:<br>भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर<br>प्रा. डॉ.संतोष कदम, म्हसवड | 114-122 |
| ९. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक न्यायाचा लढा<br>प्रा. जगन्नाथ ननवरे, औंध | 123-133 |

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार

प्रा.वैभव नानासाहेब कांबळे
श्रीमती विजयादेवी देसाई सिनिअर कॉलेज,
दौलतनगर, ता.पाटण ,जि.सातारा
भ्रमणभाष- ९५७९२८७२२७

**प्रस्तावना-**

जगातील सर्वात मोठी 'लोकशाही शासनव्यवस्था' म्हणून भारताकडे पाहिले जाते. विविध धर्म, संस्कृती, भाषा, परंपरा व चालीरितीमधील वैविध्य असतानाही एकतेचे दर्शन घडविणारे अनेक प्रसंग नजरेस पडतात. यामागे अनेक थोर महापुरूषांचे योगदान आहे. या महापुरुषांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, तत्वज्ञान व कार्यावर समताधिष्टीत समाजाची निर्मिती झाली आहे.

**उद्दिष्टे-**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्य व विचार समाजावून घेणे.
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वैचारिकतेचे स्वरुप समजावून घेणे.
३. तत्कालीन सामाजिक रुढी, परंपरांचा आढावा घेणे.
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक तत्त्वज्ञान समजावून घेणे.
५. सामाजिक समस्या जाणून घेणे.

**हिंदु समाजाची नव्याने संरचना-**

डॉ. बाबासाहेबांचा जन्म अस्पृश्य समाजात झाल्यामुळे त्या वर्गाची दुखे व त्याची अगतिकता त्यांनी अनुभवली होती. अस्पृश्यता, जातीयता, विषमता व अंधश्रद्धा या सारख्या अनिष्ट प्रथा प्रचलित होत्या. समाजात ब्राम्हण वर्गाचे वर्चस्व होते. समाजात असलेल्या अनेक

जातीपैकी महार, मांग, चांभार या जाती अस्पृश्य जाती म्हणून गणलेल्या होत्या. या जातीतील लोकांना अस्पृश्य म्हणून वागविले जात होते. त्यांच्या स्पर्शाने उच्चवर्णियांना विटाळ होतो. त्यांच्या व्यथा वेदना त्यांनी स्वतः भोगल्या होत्या. उच्चनीचतेच्या आधारावर रचलेली हिंदूसमाजाची उतरंडच त्यांना जमीनदोस्त करायची होती.

माणसा माणसात भेदभाव निर्माण करणारी जन्माधिष्टीत जाती व्यवस्था नष्ट करून हिंदू समाजाची नव्याने संरचना करण्याचे काम डॉ. बाबासाहेबांनी केले.

**सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार-**

उच्च वर्णिय लोकांना अस्पृश्यतेच्या नावाखाली दलितांना अत्यंत अपमानास्पद वागणूक देत असत. सार्वजनिक आड, विहीर, पाणवठे, आणि तलावातील पाणी घेण्याचा अधिकार दलितांना नव्हता. सामाजिक दृष्ट्या बहिष्कृत होते. त्यांच्या स्पर्शाने विटाळ होतो म्हणून त्यांची वस्ती गावकुसाबाहेर ठेवलेली असे, याचे मूळ कारण म्हणजे येथील जातीव्यवस्था होय. जातीच्या व जातीसंस्थेच्या उच्चाटनाशिवाय सामाजिक स्वातंत्र्य मिळणार नाही, याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती. हिंदू समाजातील वर्ग हे जातीने बांधले गेलेले आहेत, त्यामुळे सामाजिक स्वातंत्र्याचा लढा पूर्ण होऊ शकत नाही.

**जाती बाह्य विवाहासाठी आग्रही-**

इतर समाजातील व्यक्तीला वर्ग बदलता येतो परंतू हिंदू समाजात जात बदलता येत नाही. जाती बाह्यविवाहावर धर्मानेच कठोर निर्बंध लादलेने संपूर्ण जातीव्यवस्था बंदिस्त होती. अशा समाजात सामाजिक अभिसरणाला वाव नव्हता. बाबासाहेबांना या बंदिस्त हिंदू समाजाची पुनर्रचना केली. जाती बाह्यविवाहासाठी त्यांनी आग्रही भूमिका घेतली.

**मिश्र विवाहासाठी आवाहन-**

भारताचा इतिहास हा कनिष्ठ जाती वर लादलेल्या शोषणाचा इतिहास आहे. सामाजिक स्वातंत्र्याशिवाय ब्राम्हणशाहीचा आणि आर्थिक स्वातंत्र्याशिवाय भांडवलशाहीचा पराभव करता येणार नाही, असे बाबासाहेबांचे मत होते. कारण दलित व पद्दलितांच्या शोषणाचे मूळ कारण जातीव्यवस्था होती. हे आपले विचार "Annihilation of Caste" या पुस्तकातून मांडले. चातुर्वण्य, जन्माधिष्ठीत उच्च-नीचतेवर आधारलेली जातीसंस्था, समाजातील भेदाभेद व शोषण या सर्वातून मुक्तता मिळण्यासाठी बाबासाहेबांनी मिश्रविवाह करण्याचे आवाहन समाजाला केले.

जातीव्यवस्था ही श्रमिकांची विभागणी करणारी व्यवस्था आहे.

जातीव्यवस्था ही श्रमाची विभागणी नसून श्रमिकांची विभागणी करणारी व्यवस्था आहे. मानवी तेढ निर्माण करणारी आहे. जात ही कर्मावर आधारीत होती. त्यामूळे सामाजिक, राष्ट्रीय ऐक्य व एकात्मता निर्माण होणे शक्य नाही, असे बाबासाहेबांनी निक्षून सांगितले.

**मानवी हक्क व अधिकारांसाठीच सत्याग्रह-**

दलितांना मंदिर प्रवेश मिळावा यासाठी बाबासाहेबांनी नाशिकच्या काळाराम मंदिरात सत्याग्रह केला. माणसाला माणूस म्हणून वागणूक मिळावी हेच त्यामागे कारण दिसते. पाणी निसर्गातील सर्वांना मिळणारी गोष्ट पण सवर्णांनी पाण्याचा हक्क नाकारला म्हणून महाड येथे चवदार तळयाचा सत्याग्रह करावा लागला.

**राखीव जागांसाठी मिश्र मतदार संघ-**

ब्रिटीश शासनाने हरिजनासाठी स्वतंत्र मतदार संघाचा निर्णय जाहीर केला. हा निर्णय मागे घेण्यासाठी म. गांधी आमरण उपोषण केले. या उपोषणामुळे राजकीय परिस्थिती अस्थिर बनली. अस्पृश्यासाठी स्वतंत्र मतदार संघ नाकारावा असा आग्रह म. गांधीजीनी आंबेडकरांकडे धरला.

परंतू बाबासाहेब आपल्या **निर्णयावर** ठाम होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्रहितासाठी हरिजनांना **मिळणारा** स्वतंत्र मतदार संघाचा त्याग केला व पुणे करारावरती **सही केली. हिंदू धर्म** आणि हिंदू संस्कृतीच्या परीघा बाहेरील दलित, **अस्पृश्यांसाठी** "जातीय निवाडा" जाहीर झाल्यानंतर अस्पृश्यांसाठी राखीव जागा **असणारे** मिश्र मतदार संघ स्वीकारले. आंबेडकरांनी आपली **वैचारीक बंडखोरी** समाजपरिवर्तनासाठी खर्ची घातली.

**मनुस्मृतीदहन-हिंदूची मानसिकता बदलणे-**

'मनुस्मृती' हा ग्रंथ **जाती व्यवस्था व अस्पृश्यता**, विषमतेचा पुरस्कर्ता असून या ग्रंथातील वचना**मुळेच जातीव्यवस्था**, अस्पृश्यता, जाती बंधाला बळकटी मिळाली. शूद्रांची **सामाजिक, राजकीय** व आर्थिक कायम करणारी वचने या ग्रंथात होती. **हिंदू समाजातील** अनिष्ट चालीरिती व त्यातून निर्माण झालेली **धर्मांध प्रवृत्ती** याचे मूळ मनुस्मृतीत होते. या मनुस्मृतीचे दहनाच्या **कृती मागे हिंदू समाजातील** धर्मांध शक्ती समूळ नष्ट करण्यासाठी व हिंदूची **मानसिकता बदलावी** हीच प्रेरणा होती.

**समता व सामाजिक न्यायासाठी लोकशाही-**

जाती **व्यवस्थाही सामाजिक** न्याय व समान प्रतिष्ठा नाकारते म्हणून जातिनिर्मूलन **आवश्यक** ठरते. लोकशाही समाजव्यवस्थेत धर्मभेद, जातीभेद, लिंगभेद **इ. भेदभावांना** स्थान नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जाती**प्रथेवर आधारीत** समाजव्यवस्था मोडून त्या ठिकाणी स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, **न्याय** व धर्मनिरपेक्षता अशा मूलभूततत्त्वांवर आधारलेली **लोकशाही समाजव्यवस्था** प्रस्थापित केली." 'ज्या शासनपध्दतीत रक्तपात न घडता आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतीकार बदल **घडवून** आणता येतात, ती शासनव्यवस्था म्हणजे लोकशाही" अशी व्याख्या डॉ. आंबेडकरांनी केली.

भारतीय संविधानाचे शिल्पकार-

शतकानुशतके सर्वप्रकारच्या विषमतेत दुःस्वप्नासारखे अतिवास्तव जीवन जगणा-या दलित, वंचित आणि शोषीत अशा वर्गांना उज्ज्वल भवितव्याचे आश्वासन देणा-या संविधानाचे शिल्पकार डॉ. आंबेडकर बनले. राज्यघटनेतून सर्वांना "समानसंधी" ची हमी मिळाली. अनुसूचीत जाती - जमातींसाठी राखीव जागा व विशेष सोयी सवलतींची तरतूद केली. भारतीय संविधान हे भारतीय समाजाच्या पुनर्रचनेचे माध्यम बनले.

निष्कर्ष-

डॉ. बाबासाहेबांनी आपले संपूर्ण आयुष्य हे दलितांच्या उद्धारासाठी वाहिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समतेच्या व न्यायाच्या तत्त्वावर हिंदु समाजाची मनोरारुपी संरचनेची शल्यचिकित्सा केली. सामाजिक स्वातंत्र्यासाठी लढा उभारून मानवतावादाचा पुरस्कार केला. जातीबाहय विवाहातून सामाजिक अभिसरणाची संकल्पना रुजविली. माणसाला माणूस म्हणून जगता यावे, यासाठी जातीभेदाचा धिक्कार करून सामाजिक समतेचा डॉ. बाबासाहेबांनी पुरस्कार केला. दलित, शोषित व मजूर यांच्या ऐक्यासाठी व दैन्य नष्ट करण्यासाठी राखीव जागा व राजकीय सत्तेत सहभाग मिळवून डॉ. बाबासाहेबांनी दिला. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय व धर्मनिरपेक्षता अशी मूलभूत तत्त्वे असणारी लोकशाहीची निर्मिती केली. व्यक्ती स्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्यामूळे सामाजिक ऐक्य साधले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण जीवन हे उपेक्षीत घटकांसाठी वाहिले.

संदर्भ-

१. समकालीन भारतीय समाज-विद्युत भागवत-डायमंड प्रकाशन
२. मानवी हक्क आणि सामाजिक न्याय- प्रा. पी. के. कुलकर्णी- डायमंड प्रकाशन

३. जातीअंताचे समाजशास्त्र- प्रा. संजयकुमार कांबळे

४. दलित साहित्य वेदना व विद्रोह-भालचंद्र फडके-श्रीविदया प्रकाशन

५. साठोत्तरी मराठी वाङ.मय प्रवाह- डॉ. शरणकुमार लिंबाळे- दिलीपराज प्रकाशन

६. दलित साहित्याची वैचारिक पार्श्वभूमी -डॉ. जनार्दन वाघमारे- स्वरुप प्रकाशन

७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 'बहिष्कृत भारत' व 'मूकनायक'

८. महाराष्ट्रातील समाज सुधारक, डॉ. अनिल कठारे, विदया बुक्स पब्लीशर्स, औरंगाबाद

| Sr.No | Title of the paper | Name of Author | Department of the Teacher | Name of the journal | Year of Publication | ISBN/ISSN & Link |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Dr.B.R.Ambedkarbaratiya Samaj Ani Ambedkariya Sahitya | Mr.V.N. Kambale | Marathi | Edited book | 26 Jan 2021 | ISBN :978-93-83796-45-8 |
| 2 | Dr.B.R.Ambedkarbaratiya Samaj Ani Ambedkariya Sahitya | Dr.S.S.Sate | Politics | Edited Book | 2021 jan | ISBN :978-93-83796-45-8 |